26 APR 2025

**तरुण भारत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी वि. रा. शिंदे क्रांतिकारी लोकोत्तर व्यक्तिमत्त्व

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांचे प्रतिपादन


प्रतिनिधी
कोल्हापूर


महर्षी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारणाचे अंगीकृत कार्य करीत असताना स्वकियांकडूनच अपमान, अवहेलना आणि उपेक्षा झेलली. मात्र, ते सदैव निरपेक्ष वृत्तीने कार्य करीत राहिले. त्यामुळे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे क्रांतिकारक लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाचे धनी होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने शिंदे यांच्या जयंतीनिमित्त ज्येष्ठ विचारवंत प्रा. एन. डी. पाटील लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे: एक उपेक्षित महात्मा' या पुस्तकाचे प्रकाशन सरोज पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे आणि प्राचार्य टी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. राजन गवस म्हणाले, विठ्ठल रामजी शिंदे यशापयशाच्या परिघात ते कधीही नव्हते. केवळ आपले काम करीत राहणे, एवढेच त्यांना ठाऊक होते. महर्षींबरोबर त्यांच्या भगिनींसह सारे कुटुंबीय सहभागी होते. एन. डी. पाटील यांच्यामध्ये एक कवी दडलेला होता. त्या अंगाने त्यांनी महर्षी शिंदे यांना शापित म्हटले. महर्षी शिंदे यांना केंद्रस्थानी ठेवून महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेचे यथायोग्य मापन करण्याचे महत्त्वाचे काम एन.डी. पाटील यांनी केले. माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे म्हणाले, प्रा. एन. डी. पाटील यांनी महर्षी शिंदे यांना उपेक्षेच्या छायेतून बाहेर काढण्याचे मोठे काम एकविसाव्या शतकात केले आहे. गो. मा. पवार आणि रणधीर शिंदे यांनी महर्षींच्या अनुषंगाने दस्तावेजीकरणाचे महत्त्वाचे काम हाती घेऊन तडीस नेले आहे.

डॉ. सरोज पाटील म्हणाल्या, एन.डी. पाटील यांनी सुरवातीपासून आपल्या मूल्यांना प्राणापलिकडे जपले. त्यांच्याशी जुळवून घेताना प्रारंभी दमछाक झाली, मात्र, त्या मूल्यांशी तडजोड करण्याचा विचार कधी मनी आला नाही. हेच मूल्यसंस्कार मुलांनीही आत्मसात करून पुढे चालविले आहेत. जगभरात जी माणसे मोठी झाली, त्यांच्या अर्धांगिनींचीही समाजाने सकारात्मक दखल घेण्याची आवश्यकता आहे. प्रा. टी. एस. पाटील म्हणाले, प्रा. एन.डी. पाटील यांनी आपला सामाजिक, राजकीय व्याप सांभाळून अक्षरशः रात्रीचा दिवस करून लेखन केले आहे. त्यांच्या भाषणांचे आणि मुलाखतींचे संकलनाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठामधील विविध अध्यासनांनी धोरण निर्मितीमध्ये योगदान देण्यासाठी पुढे येणे अपेक्षित आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विविध संशोधन प्रकल्पांची यादी करून टप्प्याटप्प्याने त्यांच्यावर काम सुरू करावे.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन, सुरेश शिपूरकर, डॉ. प्रभंजन माने, डॉ. अवनीश पाटील, डॉ. मेघा पानसरे, प्रसाद कुलकर्णी, व्यंकाप्पा भोसले, डॉ. गिरीश मोरे, डॉ. भारती पाटील, नामदेवराव कांबळे, डॉ. सिंधु आवळे, डॉ. रघुनाथ कडाकणे, किसन कुराडे आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात प्रा. एन.डी. पाटील लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक उपेक्षित महात्मा' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. राजन गवस. सोबत डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. सरोज पाटील, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. टी.एस. पाटील, डॉ. रणधीर शिंदे.**

26 APR 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जलव्यवस्थापनासाठी शिक्षक, संशोधक व विद्यार्थ्यांची मदत

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : विद्यापीठात जलव्यवस्थापन कृती पंधरवड्यानिमित्त संवाद कृती कार्यक्रम

**कोल्हापूर : शाश्वत जलव्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी विद्यापीठातील शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थी नेहमीच जलसंपदा विभागासाठी योगदान देतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. जलसंपदा विभागातील महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ निमित्त आयोजित संवाद व कृती कार्यक्रमात ते उद्घाटक म्हणून बोलत होते.**

डॉ. शिर्के म्हणाले की, जलसंपदा विभागात अनेक प्रकल्प सुरू आहेत. वेगवेगळ्या कृती आराखड्यांमधून जलव्यवस्थापनाची कामे सुरू आहेत. प्रत्यक्ष अनुभवांना शैक्षणिक व संशोधनात्मक जोड मिळाल्यास एक चांगला जलव्यवस्थापन कृती आराखडा तयार करता येईल.

कार्यक्रमास पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता अभिजीत म्हेत्रे, उपअधीक्षक अभियंता संजय पाटील, कार्यकारी अभियंता देवाप्पा शिंदे, रोहित बांदिवडेकर, स्मिता माने, अशोक पवार, व्याख्याते प्रा. डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. आसावरी जाधव, प्रशांत पाटील यांच्यासह विद्यार्थी व शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठातील जलव्यवस्थापन प्रकल्पाचे तपशील सांगताना विद्यापीठ ८५० एकरात पावसाचे पाणी अडवून स्वयंपूर्ण झाल्याचे सांगितले. येत्या काळात जलसंपदा विभागाने त्यांचे अनुभव सांगून, अडचणी मांडून त्याला संशोधनाची जोड द्यावी. जेणेकरून चांगल्या संशोधनातून नवनवीन जलव्यवस्थापनाच्या उपाययोजना समोर येतील.

अधीक्षक अभियंता अभिजीत म्हेत्रे यांनी शाश्वत जलव्यवस्थापनासाठी माहिती तंत्रज्ञानाच्या युगात लोकाभिमुख कामे करून पारदर्शक पद्धतीने आराखड्यांची निर्मिती व अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे सांगितले. यानंतर त्यांनी पाटबंधारे विभागाकडे असलेल्या सिंचनक्षेत्रात येत्या काळात वाढ करून ते १०० टक्के करण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याचेही सांगितले. विद्यापीठातील भूगोल विभागाचे प्रमुख व व्याख्याते डॉ. सचिन पन्हाळकर यांनी भू-स्थानिक तंत्रज्ञानाचा वापर करून जलव्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. पर्यावरणशास्त्र विभागाच्या डॉ. आसावरी जाधव यांनी शाश्वत जलव्यवस्थापनावर भाष्य केले. नेटाफीमचे संचालक प्रशांत पाटील यांनी ठिबक सिंचनाचे महत्त्व सांगितले. कार्यकारी अभियंता रोहित बांदिवडेकर यांनी मागील काळात शिवाजी विद्यापीठाबरोबर केलेल्या कामांची माहिती दिली. प्रास्ताविक कार्यकारी अभियंता देवाप्पा शिंदे यांनी केले. यामध्ये त्यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडून जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 APR 2025
लोकमत

# मिरज महाविद्यालयाला शरद पाटील यांचे नाव

कोल्हापूर : मिरज महाविद्यालयाला प्रा. शरद पाटील यांचे नाव देण्यात आले असून या नावात बदल करण्यास शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. याबाबतचे पत्र कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी संबंधित संस्थेला पाठवले.

यशवंत शिक्षण संस्था सांगली कुपवाड (ता. मिरज, जि. सांगली) यांनी संस्थेच्या महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यासंदर्भात विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अधिकार मंडळाने महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार आता मिरज महाविद्यालय मिरज या मूळ नावाऐवजी लोकनेते प्रा. शरद पाटील महाविद्यालय, मिरज असे नाव प्रस्तावित करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 APR 2025

सकाळ



**अर्जुननगर** : येथील देवचंद कॉलेजची राष्ट्रीय वेटलिफ्टिंग खेळाडू भूमिका मोहिते हिला शिवाजी विद्यापीठाकडून मिळालेली क्रीडा शिष्यवृत्ती देताना प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे. यावेळी डॉ. रवींद्र चव्हाण आदी.

# 'देवचंद'च्या भूमिकाला विद्यापीठाची क्रीडा शिष्यवृत्ती

नानीबाई चिखली, ता. २५ : अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद कॉलेजची राष्ट्रीय वेटलिफ्टिंग खेळाडू भूमिका राजेंद्र मोहिते हिला शिवाजी विद्यापीठाची ५० हजार रुपयांची क्रीडा शिष्यवृत्ती नुकतीच मिळाली. गेल्यावर्षी हिमाचल प्रदेश येथे झालेल्या राष्ट्रीय ज्युनिअर वेटलिफ्टिंग स्पर्धेत तिने सुवर्णपदक पटकावले होते. त्यामुळे तिचा प्रस्ताव विद्यापीठाकडे शिष्यवृत्तीसाठी सादर केला होता.

क्रीडा शिष्यवृत्ती मिळण्यामागे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे तसेच क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, कोल्हापूर जिल्हा वेटलिफ्टिंग संघटनेचे सचिव प्रदीप पाटील यांचे सहकार्य लाभले.

भूमिकाला जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिष शाह, उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शाह, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. जी. डी. इंगळे यांचे प्रोत्साहन लाभले, तर जिमखाना विभागप्रमुख डॉ. रवींद्र चव्हाण, क्रीडा शिक्षक प्रा. निरंजन जाधव, जिमखाना कर्मचारी वैभव सोनार व शिवदास चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 APR 2025
सकाळ

# विद्यापीठाच्या ६३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा २०२ केंद्रांवर सुरळीत

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठच्या मार्च/ एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दोन एप्रिलपासून सुरु झाल्या आहेत. आज (ता. २५) बी.ए., बी.कॉम., बीएस्सी., बीसीए, बीए.बी.एड., बीआयडी, इंटिग्रेटेड बी.एड./एम.एड., बीबीए, एमबीए, डीएफसी, बी.व्हॉक, बॅचलर ऑफ लॉ, मास्टर ऑफ लॉ, अशा विविध ६३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने २०२ परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे झाल्या. या परीक्षांसाठी ४९,९६९ विद्यार्थी उपस्थित होते.